स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानव्या विद्याशाखेतंर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) साठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा.

- शीर्षक -

"मराठा आरक्षणाच्या संदर्भाने मराठा क्रांती मोर्चा व महाराष्ट्रातील बदलते राजकीय समीकरणे"

- संशोधक -

ठाकरे देवेंद्र उत्तमराव

एम. ए., बी. एड्. नेट (राज्यशास्त्र)

- मार्गदर्शक -

प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे

एम. ए, एम. फील, पीएच. डी.

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगांव

ता. हदगांव जि. नांदेड

सहमती पत्र

दिनांक -

श्री. देवेंद्र उत्तमराव ठाकरे यांनी स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानव्य विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी.साठी विषय निवडला आहे व त्यांच्या संशोधनाचा विषय च्मराठा आरक्षणाच्या संदर्भाने मराठा क्रांती मोर्चा व महाराष्ट्रातील बदलते राजकीय समीकरणेछ हा आहे.

या करीता हे सहमती पत्र देण्यात येत आहे.

- मार्गदर्शक -

प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे

एम. ए, एम. फील, पीएच. डी.

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगांव

ता. हदगांव जि. नांदेड

‘‘मराठा आरक्षणाच्या संदर्भाने मराठा क्रांती मोर्चा व महाराष्ट्रातील बदलते राजकीय समीकरणे’’

प्रस्तावना :-

‘जात’ हा भारतीय समाज व्यवस्थेचा अतिशय महत्वाचा घटक आहे. आधि वर्णव्यवस्था व त्या वर्णव्यवस्थेतून निर्माण झ ाालेली जाती व्यवस्था हे भारतीय समाज जीवनाचे वास्तव आहे. परंपरेने या जातीव्यवस्थेच्या उतरंडीत काही जाती वरच्या वर्गातील, काही जाती मध्यम वर्गातील तर काही जाती कनिष्ठ वर्गातील मानल्या गेल्या आहेत. या जातीच्या उतरंडी नुसारच त्या जातीची सामाजिक प्रतिष्ठा, त्या जातीचे सामाजिक अधिकार व व्यवसाय ठरवल्या गेले होते. अशीच या जातीय उतरंडीतील वर्ण व्यवस्थेत क्षत्रीय म्हणून ओळख सांगणरी मराठा ही एक जात आहे. वर्ण व्यवस्थेच्या इमारतीत दुसऱ्या स्थानावर असल्यामुळे बऱ्यापैकी सामाजिक प्रतिष्ठा या जातीला मिळाली आहे. समाजामध्ये मानमरतबा असल्यामुळे या जातीला स्वतःच्या मागसलेपणाची जाणीव व्हायला खूप वेळ लागला. शेती किंवा शेतीशी संबंधित व्यवसाय हा या जातीचा उपजिवीकेचा मुख्य स्त्रोत आहे. भारतीय शेती ही निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणारी आहे. शिवाय सिंचनाच्या सुविधा, सिंचनासाठी उपलब्ध पाणी, विज या गोष्टी फारशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे कृषी क्षेत्राची अवस्था बिकट झाली आहे. दुसऱ्या बाजुने अनेक शासकिय ध्येयधोरणे शेतीला तारक असल्यापेक्षा मारक असल्यामुळे शेतीक्षेत्राची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. बि-बियाणे, खते, मजुरी यांच्या दिवसेंदिवस किंमती वाढत असून दुसऱ्या बाजूने शेतीमालाचे भाव कमी होत आहे. शासनाच्या अनेक फुकटछाप धोरणामुळे व मनुष्यबळाच्या स्थलांतरामुळे शेतीत राबणाऱ्या मजुरांची संख्या खुप कमी झाली आहे आणि या सर्वांचा परिणाम प्रामुख्याने शेती व्यवसाय करणाऱ्या मराठा समाजावर झालेला दिसून येत आहे.

१९५० च्या दशकात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मराठा-कुणबी यांचे जातीय अनुबंध ओळखुन मराठयांना कुणबी म्हणून नोंद करण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनंती केली होती. डॉ. पंजाबराव देशमुखांनी त्यासाठी प्रयत्न सुद्धा केले होते. परंतू स्वतःला उच्चवर्णीय समजण्याची मानसिकता, स्वतःचे मागासलेपण मान्य नसल्याची भावना, काळाची पावले ओळखणाऱ्या दुरदृष्टी चा अभाव या सर्वांमुळे मराठा समाजाने स्वतःचे मागासलेपण मान्य केले नाही. शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठयांना आरक्षण देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. हे जेंव्हा मराठा समाजातील काही लोकांना कळले तेंव्हा हे लोक बाबासाहेबांच्या घरावर आम्हाला आरक्षण नको म्हणून मोर्चा घेवून गेले होते. आता तोच समाज आरक्षण मिळण्यासाठी मराठा क्रांती मोर्चाच्या माध्यमातून आरक्षणाची मागणी करीत आहे. याचा अर्थ हळुहळु का होईना मराठा समाजाला आपल्या मागासलेपणाची जाणीव होवू लागली आहे. आपली प्रगती करायची असेल, पुढे जायचे असेल, चांगले जीवनमान जगायचे असेल तर त्यासाठी एक पर्याय आहे. तो म्हणजे राखीव जागा म्हणजेच आरक्षण होय. मराठा समाजातील नविन पिढी आपल्या आजुबाजुला होणारे बदल, बदलत जाणारी सामाजिक परिस्थिती, बदलत जाणारे भारतीय जीवन यांचा आता वेध घेवू लागली आहे. या पिढीला आपले मागासलेपण मंजुर आहे. मागासलेपण मंजुर असणे म्हणजे आरक्षण आवश्यक आहे याची जाणीव होणे होय.

१९९१ नंतर आपण उदारीकरण, जागतिकीकरण व खाजगीकरण स्विकारले आहे. खुल्या अर्थव्यवस्थेचा आपण स्विकार केल्यामुळे सगळे जग ही एक बाजारपेठ झाली आहे. अनेक वस्तु, सेवा, उत्पादने मुक्तपणे या देशातून त्या देशात जावू लागली आहे. भारतीय समाजजीवन सुद्धा या मुक्त अर्थव्यवस्थेतून मिळणाऱ्या सुख-सुविधा, उत्पादन सेवा यांचा उपयोग व उपभोग घेवू लागले

आहे. आजुबाजुला ईतके सारे बदल होत असतांना शेतीक्षेत्र मात्र या बदलात कुठेच प्रतिनिधीत्व करतांना दिसत नाही. खुल्या अर्थव्यवस्थेच्या बंदिस्त चौकटीत अडकलेले क्षेत्र म्हणजेच शेतीक्षेत्र होय आणि या क्षेत्रात महाराष्ट्रामध्ये भुस्वामी किंवा भुमिहिन शेतमजुर म्हणून राबणारा सर्वात मोठा समाज म्हणजे मराठा समाज होय. शेतीक्षेत्रावरची अवकळा या समाजावर सुद्धा आली आहे. पैसा नसल्यामुळे शिक्षण घेता येत नाही. कष्टाने शिक्षण घेतले तर राखीव जागा नसल्यामुळे नौकरी मिळत नाही. खुल्या प्रवर्गात ज्याच्यांशी स्पर्धा करावी लागते तो समाज धनदांडगा व श्रीमंत आहे. त्यामुळे स्पर्धा करणे अतिशय कठिण आहे. अशा अजब कात्रीत मराठा समाज सापडला आहे. मराठा समाजातील स्त्रियांच्या बाबतीत असे म्हटले जायचे की, ‘मराठा, कुणबी, देशमुखांच्या स्त्रिया उभ्याने घरात जातात व आडव्याने घराच्या बाहेर येतात.’ परंतू मराठा क्रांती मोर्चाच्या निमीत्ताने ज्यावेळी मराठा स्त्रिया, तरुणी आपल्या न्याय्य हक्कांसाठी लक्षणीय प्रमाणात क्रांती मोर्चात सहभागी झाल्या तेंव्हाच हा समाज परिवर्तनाचा स्विकार करायला लागला आहे, या समाजालाही आपले मागासलेपण मंजुर आहे, या समाजापुढील समस्य गंभीर आहे याची जाणवी सर्वांना होवू लागली आहे.

वास्तविक मराठा जात ही राज्यकर्ता जात मानली जाते. महारष्ट्रातील राजकारणात मराठा जातीचा प्रभाव खुप मोठा आहे. आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, केंद्रीयमंत्री अशा बहुतेक पदांवर मराठा समाजातील नेते पोहचले आहेत. महाराष्ट्रात आजपर्यंत १७ व्यक्ती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आहेत. त्यापैकी १० मुख्यमंत्री हे मराठा आहेत. ०१ ते १९६० पासून ते आजतागायात ५८ वर्षाच्या महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात जवळजवळ ३३ वर्षे मुख्यमंत्री पद मराठा नेत्यांकडे होते. राज्याच्या सत्ताकेंद्रात व सत्तास्थानात मराठा नेत्यांचा बोलबाला आहे. इतके असूनही मराठा समजा मागस का राहीला याची कारण मिमांसा करणे आवश्यक आहे. मराठा समाजात खुप मोठा वर्ग असा आहे की, ज्यांच्याकडे जमीन नाही, असल्यास खुप कमी, अल्प कोरडवाहू जमीन आहे. उत्पादन साधनांचा अभवा आहे. नौकरीमध्ये स्थान नाही आणि एक वर्ग असा आहे ज्यांची संख्या कमी आहे परंतू या वर्गाकडे कारखाने, व्यापर, व्यवसाय, शिक्षणसंस्था, विविध राजकीय पदे आहेत. म्हणजेच मराठा समाजाची दोन भिन्न रुपे आपल्याला पहायला मिळतात. एक म्हणजे सर्वकाही असलेला ‘आहेरे’ वर्गातला प्रस्थापीत मराठा तर दुसरा काहिच नसलेला व संख्येने खुप जास्त असलेला ‘नाहीरे’ वर्गातला विस्थापीत मराठा समाज. आरक्षणाची मुख्यतः मागणी करणारा समाज म्हणजे हा विस्थापीत मराठा समाज होय.

अभावाची जाणीव खुप बोचरी असते. आपल्या आजुबाजुला अनेक जातीजमातींचा विकास होत असतांना, त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होत असतांना व त्यांचे जगणे समृद्ध होत असतांनाचे दृष्य ज्यावेळी मराठा तरुण-तरुणी पाहतात त्यावेळी त्यांना आरक्षणाचे महत्व समजायला लागते. आरक्षण मिळाल्यास आपल्यालाही अनेक संधी उपलब्ध होतील व त्यातून आपला विकास साधता येईल याची प्रबुद्ध जाणीव या समाजातील शिक्षीत व नवशिक्षीत तरुण-तरुणींना व्हायला लागली आहे. हळुहळु ती जाणीव वेगवेगळया माध्यमातून आहे. जाणीवांच्या पायवाटा रुंदावल्या की त्याचा राजमार्ग होत जातो. कोपर्डीसारखे एखारे प्रकरण केवळ निमीत्तमात्र आहे. तमाम मराठा समाज रस्त्यावर सामाजीक न्यायाच्या मागणीसाठी व संधीच्या उपलब्धतेसाठी रस्त्यावर उतरला आहे. या क्रांती मोर्चामुळे अनेक नविन प्रश्न व या प्रश्नांची अनेक उत्तरे मिळणार आहेत. परंतू मराठा क्रांती मोर्चामुळे महाराष्ट्र तसेच भारतातील राजकीय जीवनावर खोलवर परिणाम पडला आहे. हे तितकेच खरे आहे.

समस्या सुत्रण :-

महाराष्ट्रात मराठा, कुणबी, माळी, तेली, धनगर या महत्त्वाच्या कृषक जाती आहेत. कुणबी, माळी, तेली या जाती इतर मागास प्रवर्गात येतात. तर धनगर ही जात भटक्या प्रवर्गातील आहे. समान व्यवसाय, समान वेशभुषा, समान जीवनपद्धती अशा अनेक बाबतीत मराठा व वरील कृषक जाती यांच्यात बऱ्याच बाबतीत साम्य आहे. त्याचे वर्णन महात्मा फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात सुद्धा केले आहे. २६ जानेवारी १९५० नंतर राज्यघटनेची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर मराठा सोडून वरील इतर जातींना आरक्षणाचे लाभ मिळाले आहेत. परंतू मराठा जातीने काळाची पाऊले न ओळखल्यामुळे व राज्यघटना निर्मिती दरम्यान आरक्षणा संदर्भात उदासिनता दाखविल्यामुळे ही जात आरक्षणाच्या परिघा बाहेर राहीली. इतर जाती समूहांनी आरक्षणाच्या आधाराने काही प्रमाणात विकास साधला आहे. नौकरी, शासन-प्रशासनात आरक्षाणामुळे अनेक जाती समुहांना आपल्या हक्काच्या जागा मिळाल्या. परंतू आरक्षण नसल्यामुळे मराठा समाजाची हानी झाली.

मागासलेपण व आरक्षणाची आवश्यकता या दोन्ही अंगाने मराठा समाजातील शिक्षीत वर्ग आता विचार करु लागला आहे. हळूहळू आरक्षणाची मागणी जोर धरु लागली. २०१४ मध्ये महाराष्ट्र शासनाने मराठयांना शिक्षण व नोकरीमध्ये १६% आरक्षण दिले. परंतू ते न्यायालयात टिकले नाही. मराठा समाज हा धुमसत असलेला असंतोष अधिक तिव्र झाला व आरक्षणाच्या मुख्य मागणीसह मराठा क्रांती मोर्चाने महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक जीवन ढवळून निघाले. मराठा जात मागास आहे का? त्यांना आरक्षणाची आवश्यकता आहे का? आरक्षणामुळे मराठयांचा विकास होईल का? मराठा क्रांती मोर्चाचे काय परिणाम होतील? अशा अनेक प्रश्नांचा शोध घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत "मराठा आरक्षणाच्या संदर्भाने मराठा क्रांती मोर्चा व महाराष्ट्रातील बदलते राजकीय समीकरणे" हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

तथ्य संकलन :-

अ) प्राथमिक स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक स्त्रोत गोळा करण्यासाठी मुलाखती अनुसुची तंत्राचा अवलंब करण्यात येणार आहे. सामाजिक संशोधनात मुलाखात अनुसुचिचे तंत्र महत्त्वाचे आहे. गुड आणि हॅट यांच्या मते, ''मुलाखत ही मुलतः सामाजिक अंतर क्रियेची प्रक्रिया आहे. यावरुन मुलाखत म्हणजे काही भेटीत कोणत्याही गोष्टीबाबत संवाद होणे होय.''

नमुना दाखल घेतलेल्या मराठा कुटूंबाना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांची मुलाखत घेऊन त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, व्यवसायिक परिस्थितीची माहिती गोळा करण्यात येणार आहे.

ब) दुय्यम स्त्रोत :-

दुय्यम प्रकारचे स्त्रोत अगोदरचे दुसऱ्या व्यक्ती वा विविध स्तरावरील शासकिय किंवा गैर शासकिय संस्थांनी गोळा केलेले असतात. हे स्त्रोत सांख्यकीय प्रक्रियेतून अगोदरच गेलेले असतात. प्रस्तुत शोध प्रबंधसाठी दुय्यम स्त्रोत सरकारी व गैरसरकारी अशा दोन्ही स्त्रोतांच्या माध्यमातुन मिळविण्यात येणार आहे. सरकारी स्त्रोतांमधे अनेक समित्या, आयोग यांचे अहवाल तसेच शासनाच्या विविध कार्यालयामार्फत मिळालेली माहिती, सांख्यकीय माहिती तर गैर सरकारी स्त्रोतांमध्ये मराठा आरक्षण संदर्भात प्रकाशित ग्रंथ, अप्रकाशित शोध प्रबंध, संशोधन साहित्य, विविध संस्थांचे अहवाल तसेच विविध वृत्तपत्रे इत्यादींचा समावेश केला जाणार आहे.

नमुना निवड :-

प्रस्तुत शोध प्रबंधात नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात येणार असून यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील उमरखेड, महागांव, पुसद, आर्णी, दिग्रस, हिमायतनगर, हदगांव, माहुर, मुदखेड, भोकर तालुक्यातील निवडक मराठा कुटूंबाचा विचार केला जाणार आहे.

संशोधनाची उद्दीष्टे :-

१) मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय स्थितीच्या विविध पैलुंचा अभ्यास करणे.

२) मराठा समाजाचे प्रमुख व्यवसाय व त्यांचे आर्थिक उत्पन्न यांचा अभ्यास करणे.

३) इतर मागासवर्गीय जाती समुह व मराठा समाज यांचे जीवनमान, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४) मराठा समाज व कुणबी समाज यांच्यातील जातिय अनुबंधाचा शोध घेणे.

५)	प्रस्तापीत मराठा समाज व विस्तापित मराठा समाज यातील साम्य भेदांचा अभ्यास करणे.

६)	मराठा समाजतील राजकीय नेतृत्व व त्यांची मराठा आरक्षणाबाबतची भुमिका यांचा अभ्यास करणे.

७)	१९९१ नंतरच्या बदलत्या अर्थकारणाचा मराठा समाजावर पडलेला परिणाम याचा अभ्यास करणे.

८)	मराठा शेतकरी, तरुण-तरुणी याच्यांत होत असलेल्या आत्महत्येंच्या करणाचा शोध घेणे.

९)	मराठा समाजाच्या संदर्भात केंद्र व राज्य सरकारचे धोरण व भुमिका यांचा अभ्यास करणे.

१०)	मराठा क्रांती मोर्चाची पार्श्वभुमी, मागण्या, मराठा क्रांती मोर्चाचे परिणाम, क्रांती मोर्चाचे फलीत यांचा अभ्यास करणे.

११)	मराठा क्रांती मोर्चा व त्यांच्या महाराष्ट्रातील राजकीय समीकरणावर पडणारा परिणाम यांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :-

१)	मराठा समाज हा सामाजिक, आर्थीक व शैक्षणिक दृष्टीने मागास आहे.

२)	शेती व्यवसाय, नैसर्गिक आपत्ती (अवर्षण, अतिवृष्टी, पुर, रोगराई), शासकिय धोरणे मराठा समाजाच्या अधोगतीस कारणीभुत आहे.

३)	१९९१ नंतर बदललेल्या अर्थकारणाने मराठा समाजाची आर्थीक हानी झाली आहे.

४)	भुमीहीन, शेतमजुर, अल्प भुधारक शेतकरी, कामगार या मराठा समाजाती लोकांचा जीवनमानाचा दर्जा कनिष्ठ जाती समुहांच्या जीवनमानाप्रमाणे आहे.

५)	शेतकरी आत्महत्येत मराठा समाजातील शेतकऱ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे.

६)	मराठा समाजात प्रस्तापितांपेक्षा विस्तापितांची संख्या खुप मोठया प्रमाणात आहे.

७)	मराठा समाजात सर्वांगीण दृष्टया चौकस बुद्धी व सजकता या गोष्टीचा अभाव आहे.

८)	संधीचा अभाव, मागसलेपणाची जाणवी, कृषी क्षेत्राची पिछेहाट, मराठा तरुण-तरुणींची बेरोजगारी इत्यादी बाबी मराठा क्रांती मोर्चाच कारणीभुत आहे.

संशोधन पद्धती :-

"मराठा आरक्षणाच्या संदर्भाने मराठा क्रांती मोर्चा व महाराष्ट्रातील बदलते राजकीय समीकरणे" असा संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर संशोधनासाठी वर्णनात्मक, निदानात्मक आराखडा प्रमाण माणण्यात आला. विशिष्ठ व्यक्तीच्या समुहाच्या व स्थितीच्या वैशिष्टयांचे वा लक्षणांचे यथातथ्य वर्णन करणे हा वर्णनात्मक अध्ययनाचा हेतू असतो. वर्णनात्मक, निदानात्मक आराखडयात संशोधनाची उद्दीष्टये, नमुना निवड, तथ्य संकलणाची पद्धत, तथ्यांचे संस्करण, संकेतन इत्यादी पायऱ्यांबाबत संशोधकाला अनेक निर्णय घ्यावे लागतात. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सर्वेक्षणात्मक पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे.

संशोधनाचे महत्व :-

महाराष्ट्रातील बहुतेक अभ्यास हा एखाद्या राजकीय चळवळीचा, राजकीय पक्षांचा, राजकीय नेत्यांचा, सामाजिक संघटनेचा करण्यात आला आहे. एकुणच महाराष्ट्रातील मराठा आरक्षण प्रक्रियांचा अभ्यास झाला नाही. म्हणूनच महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाच्या संदर्भाने मराठा क्रांती मोर्चा व महाराष्ट्रातील बदलते राजकीय समीकरणे असा विषय घेऊन महाराष्ट्रातील मराठा समाजाचे आरक्षण व त्यापासून होणाऱ्या राजकीय परिवर्तन ई. चा एकत्रीत पहिलाच अभ्यास आहे. त्यामुळे भारत सरकार, महाराष्ट्र शासन, जनता, विविध संस्था, विविध राजकीय पक्ष यांना आरक्षणाचे धोरण ठरविण्यास हि संपूर्ण माहिती उपयुक्त ठरेल या सर्व दृष्टीकोनातून या अभ्यासाचे महत्व आहे.

संशोधनाची मर्यादा व व्याप्ती :-

मराठा समाज महाराष्ट्रात लक्षणिय संख्येत आहे. जवळपास महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात या समाजाचे वास्तव्य आहे. नांदेड हा मराठवाडयातील जिल्हा असून यवतमाळ हा विदर्भातील जिल्हा आहे. नांदेड जिल्ह्यातील मराठा व यवतमाळ जिल्ह्यातील कुणबी या दोन जातीमध्ये रोटी-बेटी व्यवहार आहे. खान-पान, रुढी परंपरा, देव-देवता, सण-उत्सव, आचार-विचार या अनेक बाबतीत दोन्ही समाजामध्ये खुप मोठे साम्य आहे. या सर्व बाबींचा विचार करुन सदर संशोधनासाठी यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील मराठा व कुणबी समाजातील निवडक कुटूंबांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण आराखडा

प्रकरण पहिले - प्रस्तावना

या प्रकरणात मराठा आरक्षणाची पार्श्वभुमी मराठा आरक्षणाची सध्यस्थिती, संशोधनाची उद्दिष्टये, गृहितके, विषयाची निवड, क्षेत्र संशोधन, नमुना निवड, संशोधन आराखडयाची माहिती, प्रकाशित ग्रंथ, विविध अहवाल, शोध निबंध, लेखन साहित्याचा आढावा तसेच अप्रकाशित साहित्यात प्रामुख्याने शोध प्रबंधाच्या अनुषंगाने आढावा घेवून समारोप जाणार आहे.

प्रकरण दुसरे - मराठा आरक्षण व शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विचार आणि कार्य

या प्रकरणात मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केलेले कार्य व त्यांची आरक्षणाबाबतची भुमिका याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - मराठा आरक्षण व विविध समित्या आणि आयोग

प्रस्तुत प्रकरणात मराठा आरक्षणासंदर्भात कालेलकर आयोग, मंडल आयोग, न्यायमुर्ती बापट अहवाल, नचीअप्पन अहवाल, राणे समिती अहवाल व शिफारशी यांचा सखोल आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे - महाराष्ट्र व मराठा समाज एक दृष्टीक्षेप

या प्रकरणात महाराष्ट्रातील मराठा समाजाचा इतिहास, मराठा समाजाच्या सामाजिक, आर्थीक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक व्यवस्थेचा आढावा घेतला जाईल. त्यानंतर मराठा समजा व कुणबी समाज या दोन्ही समाजातील विविध साधर्म्य दर्शक पैलुंची चर्चा करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - मराठा समाजाचा प्रमुख व्यवसाय व मागासलेपाणी कारणमीमांसा

या प्रकरणात मराठा समाज करत असलेल्या प्रमुख व्यवसायांची व प्रामुख्याने शेती व्यवसायांची माहिती घेवून मराठा समाजाच्या मागासलेपणाची कारणमीमांसा करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे - मराठा समाजातील राजकीय नेतृत्व व त्यांची मराठा आरक्षण संदर्भात भुमिका

प्रस्तुत प्रकरणात सर्व पक्षीय मराठा जातीतील राजकीय नेतृत्व या मराठा समाजाच्या राजकीय नेतृत्वाची मराठा आरक्षणासंदर्भातील भुमिका तसेच मराठा आरक्षणाबाबतीत त्यांची आस्था - अनास्था, बांधिलकी, उदासिनता याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे - मराठा समाज, मराठा क्रांती मोर्चा व महाराष्ट्रातील बदलते राजकीय समीकरणे

या प्रकरणात मराठा क्रांती मोर्चाची पार्श्वभुमी, कारणे, मराठा क्रांती मोर्चातील मागण्या, मराठा क्रांती मोर्चा व या क्रांती मोर्चाचे फलीत व परिणाम यांचा शोध या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण आठवे - सारांश व निष्कर्ष

"मराठा आरक्षणाच्या संदर्भाने मराठा क्रांती मोर्चा व महाराष्ट्रातील बदलते राजकीय समीकरणे" या शोध प्रबंधात मराठा समाजाच्या आरक्षण मागणीचा विविध अंगाणे अभ्यास करण्यात येणार आहे. या अभ्यासाअंती संशोधनातुन काढण्यात येणारे निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात मांडले जाणार आहेत. तसेच शोध प्रबंधाचा सारांश सुद्धा मांडला जाणार आहे.

संदर्भ सुची :-

१) अर्जुन कोकाटे (२०१६) , मराठा क्रांती अंदोलन विशेषांक

२) अमृत साळुंके (२०१७), लोकायत प्रकाशन, मराठा समाज - इतिहास, वर्तमान आणि भविष्य

३) नामदेव पवार, अंकुश अवारे (२०१७), हर्मिस प्रकाशन, मराठा क्रांती मोर्चा - वृतांत आणि विश्लेषण

४) प्रदिप गायकवाड (२०१७), महाराष्ट्रातील आरक्षण कायदे

५) प्रदिप सोळुंके (२०१६) पंचफुला प्रकाशन, मराठा क्रांती मोर्चा का व कशासाठी ?

६) प्रताप अजबे (२०१६), जिजाई प्रकाशन, मराठा आंदोलन असंतोष आणि बहुजनवादी चळवळीची दिशा

७) प्रविण गायकवाड (२०१३) , जिजाई प्रकाशन, आरक्षण.

८) पुरुषोत्तम खेडेकर (२००९), जिजाई प्रकाशन, मराठा आरक्षणाचा खून ! बापट आयोग

९) पुरुषोत्तम खेडेकर (२०१७), जिजाई प्रकाशन, मराठा क्रांती मोर्चा

१०) पुरुषोत्तम खेडेकर (२००६), जिजाई प्रकाशन, आरक्षण वाढवा, देश घडवा !

११) प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे (२०१६), पंचफुला प्रकाशन - मराठ्यांचा इतिहास

१२) सचिन माळी (२०१७), लोकवाङमयगृह, मराठा आंदोलन जातियुद्ध की जातिअंत

१३) सुधिर गवळी (२०१६), सुधिर प्रकाशन, भारताचे संविधान

१४) स्वप्निल घुमरे (२०१५), पंचफुला प्रकाशन, मराठा आरक्षण का ? व कशासाठी ?

१५) उत्तम कांबळे (२००८), लोकवाङमयगृह, O.B.C. चे राजकारण

-संशोधक-

देवेंद्र उत्तमराव ठाकरे

एम.ए., बी.एड. नेट

(राज्यशास्त्र)

- मार्गदर्शक -

प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे

एम. ए, एम. फील, पीएच. डी.

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

हदगांव ता. हदगांव जि. नांदेड